ePaper

# अक्षय केळकर ठरला बिग बॉस मराठी 4 चा विजेता!



वर्ष - 6 । अंक - 265 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- खासदार सुप्रिया सुळे यांची कार्यकर्त्यांसह सिंहगडावर स्वच्छता मोहिम
- 'इंद्रायणी थंडी'त नवोदितांना संधी !
- पालिकेच्या कॅग चौकशीसाठी धावाधाव


www.mahaenews.com | सोमवार, दि. 9 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महामार्ग प्राधिकरणाला 'अल्टिमेटम'!

## ग्रामस्थांच्या बैठकीत निर्णय : आमदार, खासदार कुणीही पुढाकार घ्या, पण टोलवसुली थांबवा!

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोशी-चांडोली टोल वसुली मुदत संपल्यानंतर पुन्हा कार्यान्वयीत करुन स्थानिक नागरिकांकडून टोल वसुली केली जात आहे. ही बाब अन्यायकारक असून, स्थानिक आमदार महेश लांडगे किंवा खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पक्षीय जोडे बाजूला ठेवून टोल वसुलीचा निर्णय रद्द करण्यासाठी पुढाकार घ्यावा. मोशीसह परिसरातील सर्वपक्षीय पदाधिकारी सकारात्मक भूमिकेतून या लढ्यात सहभागी होतील, असा निर्धार मोशीतील ग्रामस्थांच्या बैठकीत करण्यात आला.**



मोशी-चांडोली टोलनाका बंद झालाच पाहीजे अन्यथा मोशी ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. येत्या दहा दिवसांत राष्ट्रीय महामार्ग विभागाने योग्य निर्णय घ्यावा अन्यथा परिणामांचा सामना करावा लागेल असा 'अल्टिमेटम' ग्रामस्थांनी दिला आहे.

श्री नागेश्वर महाराज मंदीर येथे रविवारी सकाळी दहा वाजता मोशी टोलनाकाबाबत दिशा ठरविण्यासाठी ग्रामस्थांनी बैठकीचे आयोजन केले होते. त्यामध्ये पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. मोशीकरांनी राष्ट्रीयमहामार्ग प्रमुखांसह, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन करून, लवकरात-लवकर टोल बंद करण्याची मागणी केली आहे.

### दि. 19 जानेवारीपासून आंदोलनाचा इशारा...

» बंद केलेला टोल पुन्हा सुरु करण्याची प्रशासनाला गरज काय ? वाहतूक कोंडीसह नागरिकांना आर्थिक भूर्दंड वाहनचालाकांना सहन करावा लागतो. भोसरी, चाकण एमआयडीसीतील लघुउद्योजकांना मोठा फटका बसणार आहे. त्यामुळे हा टोल बंद झालाच पाहिजे, यासाठी सर्वपक्षीय नगरसेवक, युवा नेते, ग्रामस्थांनी एकत्र येऊन टोलबाबत विरोध केला आहे. टोलबंदचा निर्णय नाही झाल्यास येत्या दि. १९ जानेवारी रोजी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी बैठकीत घेतला आहे.



# मनसे अध्यक्ष राज ठाकरेंकडून जगताप कुटुंबियांचे सांत्वन!

## सहवेदना : मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

। पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी मंत्री व आमदार संजय कुटे, भाजप आमदार अभिमन्यू पवार, शेकापचे आमदार जयंत पाटील यांनी रविवारी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना त्यांच्या पिंपळे गुरव येथील निवासस्थानी येऊन श्रद्धांजली वाहिली. सर्वांनी त्यांचे बंधू व भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांच्याशी संवाद साधून त्यांच्या कार्याला उजाळा दिला. तसेच कुटुंबातील इतर सदस्यांचीही विचारपूस केली.**



दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप जगताप यांचे सर्वपक्षीय आणि सर्व क्षेत्रातील मान्यवरांसोबत जिव्हाळ्याचे संबंध होते. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबतही त्यांनी चांगले राजकीय संबंध ठेवले होते. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी सकाळी पिंपळेगुरव येथील त्यांच्या निवासस्थानी येऊन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. तसेच दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू व भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांच्याशी संवाद साधून सांत्वन केले. त्याचप्रमाणे कुटुंबातील इतर सदस्यांची विचारपूस करत दुःखातून सावरण्यासाठी धीर दिला.

### पक्षासाठी केलेल्या कार्याचे स्मरण...

» राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी मंत्री व विद्यमान भाजप आमदार संजय कुटे, आमदार अभिमन्यू पवार, शेकापचे आमदार जयंत पाटील यांनीही रविवारी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निवासस्थानी भेट दिली. त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. या सर्वांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू व भाजपचे चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांच्याशी संवाद साधून त्यांनी पक्षासाठी केलेल्या कार्याला उजाळा दिला.

## शॉर्ट न्यूज

### कोव्होव्हॅक्स लस अधिक परिणामकारक



**पुणे :** ओमायक्रॉनच्या नवीन व्हेरियंटच्या विरोधात कोव्होव्हॅक्स लशीला बूस्टर म्हणून येत्या काही दिवसांत मान्यता मिळेल, अशी माहिती सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदर पूनावाला यांनी रविवारी दिली. कोव्हिशिल्ड लसीचे उत्पादन बंद आहे, असेही त्यांनी सांगितले.
पहिला डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्काराने अदर पूनावाला यांना गौरविण्यात आले. या कार्यक्रमानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींबरोबर संवाद साधला.'केंद्र सरकारकडे कोव्हीशिल्ड लशीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. तूर्तास लसीचे उत्पादन बंद असले तरी आवश्यकता भासल्यास पुन्हा सुरू केले जाईल, असे त्यांनी कोव्हिशिल्ड लशीच्या अपु-या पुरवठ्याबाबत सांगितले. ते म्हणाले की, नवीन व्हेरियंटविरोधात कोव्होव्हॅकस जास्त परिणामकारक आहे. त्यामुळे बूस्टर मात्रेसाठी लवकरच परवानगी मिळेल.

## खासदार सुप्रिया सुळे यांची कार्यकर्त्यांसह

# सिंहगडावर स्वच्छता मोहिम!

### » समाजसेवी संस्था व दुर्गप्रेमीही स्वच्छता मोहिमेत सहभागी

**। सिंहगड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

खासदार सुप्रिया सुळे यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह सिंहगडावर स्वच्छता मोहिम राबवत वाहनतळ ते नरवीर तानाजी मालुसरे समाधी पर्यंतचा मार्ग व लगतच्या परिसराची स्वच्छता केली. यावेळी काही समाजसेवी संस्था व दुर्गप्रेमीही स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.



सकाळी सात वाजण्याच्या सुमारास खासदार सुप्रिया सुळे सिंहगडावर दाखल झाल्या होत्या. वन विभागाने स्वच्छता मोहिमेसाठी तयारी करत अगोदरच आवश्यक साहित्याची जमवाजमव करून ठेवली होती.

गाडीतळापासून सुळे यांनी स्वच्छता मोहिमेला सुरुवात करत रस्त्याच्या कडेने पडलेल्या प्लास्टिक पिशव्या, खाद्यपदार्थांची रिकामी पाकिटे, पाण्याच्या बाटल्या, कागद व इतर कचरा गोळा करण्यास सुरुवात केली. गाडीतळापासून नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीपर्यंत सुप्रिया सुळे या पुर्णवेळ कचरा गोळा करत होत्या.

कचरा गोळा करताना सुळे कार्यकर्ते व पर्यटकांशी संवाद साधत गडाचे पावित्र्य राखण्याबाबत आवाहन करत होत्या. दरम्यान अनेक तरुण, तरुणी, नागरिक सुप्रिया सुळे यांच्यासोबत फोटो काढण्याचा आग्रह करत होते त्याला सुळे यांच्याकडूनही प्रतिसाद मिळत होता.

यावेळी काका चव्हाण, त्र्यंबक मोकाशी, नवनाथ पारगे, शुक्राचार्य वांजळे, पूजा पारगे, सायली वांजळे, डॉ. नंदकिशोर मते,सुभाष हगवणे, शरद दबडे, आनंद मते, सुरेखा दमिष्टे, खुशाल करंजावणे, नरेंद्र हगवणे,साहिल कांबळे, सुरेश गुजर आदी उपस्थित होते.

---

# सरकार पाडून दाखवा; नाहीतर राजीनामा देणार का? : मुनगंटीवार

### » पुण्यात एका कार्यक्रमानिमित्त मुनगंटीवार यांनी पत्रकारांशी साधला संवाद

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**"राज्यातील हे सरकार फेब्रुवारीपर्यंत पडेल, असे संजय राऊत म्हणत आहेत. १५ मार्चपर्यंत हे सरकार पाडून दाखवा आणि समजा सरकार पडले नाही, तर राऊत खासदारकीचा राजीनामा देणार का?"**

असे मत व्यक्त करत राज्याचे वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी राऊतांना खुले आव्हान दिले. पुण्यात एका कार्यक्रमानिमित्त आले असताना मुनगंटीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला.



### चित्रपटांना दुप्पट अनुदान देण्यात येईल

» मुख्यमंत्र्यांकडे महाविकास आघाडीच्या काळातील अपयशावर श्वेतपत्रिका काढण्याची मागणी करणार आहे." जवळपास ४०० चित्रपटांच्या थकलेल्या अनुदानाबाबत ते म्हणाले,"या चित्रपटांच्या अनुदानासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच चित्रपटाच्या अनुदानासाठी नवी नियमावली करत आहोत. राष्ट्रीय पुरस्कार मिळणाऱ्या चित्रपटांना दुप्पट अनुदान देण्यात येईल."

ते म्हणाले,"महाराष्ट्रातील उद्योग बाहेर गेले, असे राज ठाकरे बोलले असतील, तर ते मी एकले नाही. परंतु असे असेल तर ठाकरे यांनी त्याबाबत कागदपत्रे समोर आणावी. उगाच राजकीय सत्तेपोटी अशी वक्तव्ये करू नयेत. उद्योग राज्याबाहेर गेले हा निव्वळ अपप्रचार आहे.

मुख्यमंत्र्यांकडे महाविकास आघाडीच्या काळातील अपयशावर श्वेतपत्रिका काढण्याची मागणी करणार आहे.'' जवळपास ४०० चित्रपटांच्या थकलेल्या अनुदानाबाबत ते म्हणाले,"या चित्रपटांच्या अनुदानासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच चित्रपटाच्या अनुदानासाठी नवी नियमावली करत आहोत. राष्ट्रीय पुरस्कार मिळणाऱ्या चित्रपटांना दुप्पट अनुदान देण्यात येईल."

---

# विद्यापीठ शिक्षक निवडणुकीत विक्रमी ८० टक्के मतदान




**।पुणे महाईन्यूज । प्रतिनिधी।**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा आणि विद्या परिषदेसाठी शिक्षक प्रतिनिधींसाठीच्या निवडणुकीत रविवारी विक्रमी ८० टक्के मतदान झाले. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर आणि नाशिक येथील एकूण ४५ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेसाठीची प्रक्रिया सुरू आहे. त्यात शिक्षक मतदारांमधून एकूण दहा प्रतिनिधी निवडून देण्यासाठी, विद्यापरिषदेवर एकूण सहा प्रतिनिधी निवडून देण्यासाठी, विविध अभ्यास मंडळांवर महाविद्यालयाच्या विभाग प्रमुखांमधून तीन विभाग प्रमुख निवडून देण्यासाठी रविवारी मतदान झाले. या निवडणूक प्रक्रियेत विद्यापीठाचे दोनशेहून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी काम केले. अधिसभेसाठी ७९.८४ टक्के, तर विद्या परिषदेसाठी ८०.१२ टक्के मतदान झाले. निवडणुकीची मतमोजणी मंगळवारी (१० जानेवारी) सकाळी आठ वाजल्यापासून विद्यापीठाच्या आवारात सुरू होणार आहे. या मतमोजणीसाठी सुमारे 300 अधिकारी व कर्मचारी तैनात केले असून सायंकाळी सहा वाजेपर्यंत सर्व निकाल हाती येण्याची शक्यता आहे.

# ‘इंद्रायणी थडी’त नवोदितांना संधी!

## महाराष्ट्रातील सर्वात मोठी जत्रा : येत्या दि. 25 जानेवारीपासून 5 दिवस पर्वणी






**पिंपरी । महाईन्यूज ।**

महाराष्ट्रातील सर्वात मोठी म्हणून लौकिक प्राप्त "इंद्रायणी थडी" जत्रेतील स्टॉल नोंदणीकरिता तब्बल ५ हजारहून अधिक इच्छुकांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे यावर्षीसुद्धा ही जत्रा मोठ्या दिमाखात साजरी होणार, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. महिला सक्षमीकरण उद्योजकता विकास आणि नवोदितांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून, तसेच शिवांजली सखी मंचच्या अध्यक्षा पूजा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिवर्षी "इंद्रायणी थडी" जत्रेचे आयोजन केले जाते.

यावर्षी जत्रेमध्ये एकूण ८०० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. यासोबतच ग्राम संस्कृती, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक दस्तावेज प्रदर्शन, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या कलाकृती यासह नवोदित कलावंतांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विविध प्रकारातील शंभरहून अधिक मनोरंजन प्रबोधन आणि आरोग्य विषयक कार्यक्रम उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. त्यामुळे यावर्षी संपूर्ण राज्यभरातून सुमारे २५ लाखहून अधिक नागरिक जत्रेला भेट देतील, अशी अपेक्षा समन्वयक संजय पटनी यांनी व्यक्त केली.CXGLE/5CNEZTUJQ11VMUHB7 या गुगल फॉर्ममध्ये माहिती भरावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नवोदितांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ...

**»पिंपरी-चिंचवड शहर आणि राज्यभरातील नवोदित कलावंत यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे. या हेतूने यावर्षी इंद्रायणी थडी जत्रेमध्ये सुमारे ४० प्रकारच्या विविध स्पर्धा आयोजित केल्या आहेत. त्यामुळे कलाक्षेत्रातील संस्था अथवा व्यक्ती कला-कौशल्यांच्या स्पर्धा घेण्यात इच्छुक असेल, तर जत्रा संयोजकांकडून पुरेशी जागा, स्टेज, ब्रॅण्डिंग, प्रशस्तीपत्रक, बक्षिसे, प्रमुख पाहुणे यांचे नियोजन करून देण्यास तयारी संयोजकांनी ठेवली आहे. केवळ स्पर्धेचे नियोजन आणि परीक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारण्यास तयार असलेल्या संस्था अथवा व्यक्तींनी अमोल देशपांडे 87 96 43 44 32 त्यांच्याशी संपर्क करावा किंवा HTTPS://FORMS.**

---

# ... असा लढवय्या नेता होणे नाही!

## » पिंपळे निलखवासीयांची सामूहिक आदरांजली : सर्व पक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थांची उपस्थिती



**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भारतीय जनता पार्टीचे नेते तथा दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना पिंपळे निलखवासीयांनी सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. आमदार जगताप यांच्या प्रतिमेस प्रभागातील नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी प्रभागातील नगरसेविका आरतीताई चोंधे, काँग्रेस महाराष्ट्र कमिटी सचिव सचिन साठे, 'पीसीएमटी'चे माजी सभापती दिलीप बालवडकर, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष संकेत चोंधे, भुलेश्वर नांदगुडे, नितीन इंगवले, तात्या कामठे, एसीपी श्रीकांत पाटील, नरेंद्र गायकवाड, जयसिंग डुंबरे सर, अलका मकवाना, कल्पना सदाकाळ, भरत इंगवले, सुधाकर वेदपाठक, सुभाष इंगळे, मोहित नागावकर, सुवर्णा गाडे, गीता जगताप, वेदवंती उपाध्याय, विमल गायधनकर, कुंदा पाटे, उज्वला पोवार, अनिल संचेती, प्रवीण मंडारे, विठ्ठल चौधरी, विशाल मड्डमवार, बाळासाहेब इंगवले, राकेश गिरमे, एस बी पाटील, अनंत गर्जे, रंगराव माने, नंदकुमार बालवडकर, संदीप बोडके, काळूराम नांदगुडे, रामचंद्र गायधनकर, राजेंद्र जगताप, दीपक मोकाशी, गोडंमपल्ली, नागेश जाधव, राहुल पठारे, पवन कामठे आदी नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

### आमदार जगताप यांच्या आठवणींना उजाळा...

**» पिंपरी-चिंचवड शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय तसेच विकासात्मक जडण-घडणीमध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे मोलाचे योगदान आहे. सुमारे ३५ वर्ष शहराच्या सामाजिक राजकीय क्षेत्रात कारकीर्द यशस्वी करणारे जगताप यांनी पिंपळे निलख आणि परिसराच्या विकासासाठी कायम सकारात्मक भूमिका घेतली आहे, अशी भावना उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.**

---

# "गुजरातचे आहोत म्हणून त्याच भागाला प्राधान्य देणे पंतप्रधान नरेंद्र मोदींना शोभत नाही - राज ठाकरे"



**पिंपरी** : महाराष्ट्र राज्य सर्वार्थाने श्रीमंत आहे. त्यामुळे एखाद-दुसरा उद्योग बाहेर गेल्याने फार नुकसान होणार नाही. हा दर्या मे खसखस असा हा प्रकार आहे, आपण गुजरातचे आहोत म्हणून त्याच भागाला प्राधान्य देणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शोभत नाही. राज्यकर्ता मोठ्या मनाचा असावा. तो कधीच व्यापारी नसावा. व्यापारी त्याच्या हाताखाली असावा, असे मत परखड मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख आणि प्रसिद्ध व्यंगचित्रकार राज ठाकरे यांनी व्यक्त रविवारी पिंपरीत केले. पिंपरी-चिंचवड शहरात जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ यांच्या वतीने शोध मराठी मनाचा या १८ व्या जागतिक मराठी संमेलनात ठाकरे बोलत होते. त्यांची प्रकट मुलाखत ज्येष्ठ व्यंगयत्रिकार प्रभाकर वाईरकर आणि ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांनी घेतली. त्यात ठाकरे यांनी व्यंगचित्रकला, तिचे भवितव्य, मुस्कटदाबी, सध्याचे राजकारण, बेरोजगारी यावर परखड मते मांडली. स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील आणि यशराज पाटील यांनी ठाकरे यांचा सत्कार केला. प्रत्येक राज्य हे समान मुलासारखे असले पाहिजेराज्यघटनेने संघ राज्याची चौकट तयार केली आहे. देशातील एकाच विशिष्ट राज्याला प्राधान्य देणे हे चुकीचे नाही का?, यावर ठाकरे म्हणाले, “हे मी आधीच बोललो आहे. तेव्हा सर्वांचा शहामृग झाला होता. सगळ्यांनी माना आत घातल्या होत्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाकडे लक्ष दिले पाहिजे. देशातील प्रत्येक राज्य हे त्यांच्यासाठी समान मुलासारखे असले पाहिजे. आपण स्वत: गुजराती आहोत म्हणून गुजरातला प्राधान्य देणे, हे एका पंतप्रधानाला शोभत नाही. मनमोहन सिंग पंजाबचे म्हणून सर्व पंजबला, उद्या तमिळ पंतप्रधान होईल म्हणून सर्व तमिळनाडूला देईल, ही कुठची पद्धत आहे.

## संपादकीय »

# हायड्रोजनला ऑक्सिजन

*हायड्रोजनच्या इंधनवापरास तब्बल दीडशे वर्षांचा इतिहास आहे. तो समजून घेण्याचा शहाणपणा दाखवायला हवा...*

देशातील दोन प्रमुख उद्योगसमूहांनी हायड्रोजन इंधन निर्मितीत रस दाखवणे आणि केंद्र सरकारचे हायड्रोजन धोरण प्रसृत होणे या योगायोगाकडे दुर्लक्ष केले तरी यानिमित्ताने या नव्या इंधनाच्या बऱ्यावाईटाची चर्चा करणे अयोग्य नाही. सध्या साऱ्या विश्वालाच नव्या, स्वच्छ, पर्यावरणस्नेही इंधनाचा ध्यास लागला आहे. दिवसेंदिवस महाग होत चाललेले पेट्रोल / डिझेल आणि त्याहीपेक्षा महाग पडेल अशी पर्यावरणीय हानी ही यामागील प्रमुख दोन कारणे. गेल्या काही वर्षांत आपणही या दिशेने जोरदार मुसंडी मारण्याच्या प्रयत्नात आहोत. याच उद्देशाने अलीकडे विजेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही मोटारींस मोठे उत्तेजन दिले जाते. त्या मोटारींतील विजेऱ्या पुन्हा भारित करण्यासाठी लागणारी वीज तयार करण्यापायी आपल्याकडे मोठय़ा प्रमाणावर भले कोळसा जाळण्याचा विसंवाद डोळय़ावर येत असेल. पण तरीही या प्रयत्नांचे मोल कमी होत नाही. इथेनॉल या द्रवास पर्यायी इंधन म्हणून उत्तेजन देण्याबाबतही असेच. इथेनॉल आपल्याकडे उसावरील प्रक्रियेतून निर्माण होते. म्हणजे उसासाठी पाणी प्रचंड प्रमाणावर ओतायचे आणि त्यातून तयार होणारे इथेनॉल मोटारींत इंधन म्हणून वापरायचे असे हे सव्यापसव्य. पण ते करण्यास इलाज नाही. कारण पर्यायी इंधनाची भूकच इतकी मोठी आहे की मिळेल त्या मार्गाने ती भागवणे आवश्यक ठरते. याच मालिकेतील पुढचे पाऊल म्हणजे 'हिरव्या हायड्रोजन'चा वापर इंधन म्हणून करणे. त्यासाठी केंद्र सरकारने मोठा कार्यक्रम जाहीर केला असून त्याकामी जवळपास २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तिचे स्वागत. याच सुमारास दोन बडय़ा उद्योगसमूहांचे हायड्रोजन निर्मितीचे कार्यक्रम जाहीर झाले, हेही स्वागतार्हच म्हणायचे. आता हायड्रोजन या इंधनाविषयी. एक वायू या नात्याने हायड्रोजन यास स्वतंत्र अस्तित्व नाही. कोणाशी ना कोणाशी हातमिळवणी केल्याखेरीज तो टिकू शकत नाही. म्हणजे इंधनासाठी म्हणून त्याचे विलगीकरण करणे आवश्यक. यासाठी सोपा, सहज उपलब्ध घटक म्हणजे पाणी. याखेरीज अन्य मार्गाने, म्हणजे पेट्रोल / डिझेलमधूनही त्यास विलग करता येते. पण तो हायड्रोजन पर्यावरणस्नेही नसतो. त्यास करडा हायड्रोजन असे म्हणतात.

# सागरी परिसंस्थेवर विनाशकारी प्रभाव!




प्रवाळ ब्लीचिंगच्या परिणामांप्रमाणे या रोगाचा प्रभाव उलट केला जाऊ शकत नाही. तो एकदा झाला की झाला! आणि लागण झाली की, त्याचा शेवट म्हणजे मृत्यू! प्रवाळ नष्ट होणे म्हणजे सागरी परिसंस्थेवर विनाशकारी प्रभाव! प्रवाळांचे खडक जंगलांप्रमाणे अनेक जिवांचे जीवन टिकवणारे आहेत.

पर्यटकप्रिय थायलंड या देशातील सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे निळेशार समुद्र आणि समुद्राखालील सजीवसृष्टी! समुद्राखालील रंगबिरंगी मासे, वनस्पती आणि प्रवाळांचे खडक हे पर्यटकांच्या विशेष पसंतीचे. परंतु शास्त्रज्ञांच्या नुकतेच लक्षात आले की, पूर्व थायलंडच्या शांत नीलमणी पाण्याखाली, वेगाने पसरणारा रोग समुद्रतळाच्या विस्तीर्ण प्रवाळांना मारत आहे. हवामान बदलामुळे ही परिस्थिती आणखी वाईट होऊ शकते. या रोगाला येलो-बँड रोग म्हणतात. कारण हा रोग जडला की, प्रवाळ नष्ट होण्याआधी त्यांच्यावर पिवळ्या रंगांचे पट्टे तयार होतात. हा आजार काही दशकांपूर्वी प्रथमच दिसला होता आणि कॅरिबियनमधील खडकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. सर्वांत वाईट म्हणजे, यावर इलाज नाही!



हा रोग प्रवाळांना तर नष्ट करतो आहेच, शिवाय परिसरातील अनेकांच्या उपजीविकेलाही धोका निर्माण झाला आहे. या भागातील अनेक जण नैसर्गिक सौंदर्य, विशेषतः प्रवाळ खडक पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांकडून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असतात. यावर पर्याय शोधण्यासाठी थाई शास्त्रज्ञ कसोशीने प्रयत्न करीत आहेत. समुद्रतळाशी जाऊन तेथील छायाचित्रे, नमुने गोळा करीत आहेत. याची माहिती अनेक माध्यमांद्वारे लोकांपर्यंत पोहोचवली जात आहे. लवकरच यावर इलाज मिळेल, अशी आशा आहे!

थायलंडमध्ये पर्यटकप्रिय पटाया येथे एका वर्षापूर्वी हा रोग आढळला. अल्पावधीत समुद्रतळाशी सुमारे ६०० एकरांत तो पसरला आहे. हवामानबदलामुळे मासेमारीचे वाढते प्रमाण, प्रदूषण आणि पाण्याचे वाढते तापमान हे येलो-बँड रोगास पूरक आहे. प्रवाळ ब्लीचिंगच्या परिणामांप्रमाणे या रोगाचा प्रभाव उलट केला जाऊ शकत नाही. तो एकदा झाला की झाला! आणि लागण झाली की, त्याचा शेवट म्हणजे मृत्यू! प्रवाळ नष्ट होणे म्हणजे सागरी परिसंस्थेवर विनाशकारी प्रभाव! प्रवाळांचे खडक जंगलांप्रमाणे अनेक जिवांचे जीवन टिकवणारे आहेत.

त्यांचा मृत्यू या सर्व सजीवांवर परिणाम करू शकतो.

# हिवाळी अधिवेशनातून जनतेच्या हाती काय लागले?

**नागपूरचे यंदाचे दिवाळी अधिवेशन करोना महासाथीनंतरचे पहिलेच अधिवेशन होते. पण लोकांचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने त्यात कसलेच गांभीर्य नव्हते. विदर्भातील प्रश्न अधोरेखित करण्यासाठी तिथे दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या या अधिवेशनाच्या औचित्याचे भान दाखवण्याऐवजी लोकप्रतिनिधींना पक्षीय राजकारणातच जास्त रस होता..**

डिसेंबरातलं राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन नुकतंच झालं. हिवाळी अधिवेशन दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर नागपूर येथे पार पडत असल्याने, या वेळी विदर्भातली मंडळी खूश होती. अधिवेशनाकडून अपेक्षाही होत्या. त्या अपेक्षांची पूर्तता कितपत झाली, ते पाहू. दोन वर्षांच्या अंतराने, गेल्या महिन्यात १९ ते ३० डिसेंबर या कालावधीत हिवाळी अधिवेशन नागपूरला भरलं होतं. १० दिवस चाललेल्या या अधिवेशनात विधानसभेचं रोजचं सरासरी कामकाज ८ तास २५ मिनिटं आणि एकूण कामकाज ८४ तास १० मिनिटं चाललं. एकूण ८ तास ३१ मिनिटं गोंधळामुळे वाया गेली. विधान परिषदेत दररोज सरासरी ५ तास १५ मिनिटं आणि एकूण ५२ तास ३५ मिनिटं कामकाज झालं. मंत्री वेळेवर उपस्थित नसल्याने २० मिनिटं वाया गेली. तर अन्य कारणांमुळे ४ तास ५५ मिनिटं



वाया गेली. अधिवेशनासाठी सदस्यांची सरासरी उपस्थिती ७९.८३ टक्के राहिली. कमाल उपस्थिती ९१.३२ टक्के, तर किमान उपस्थिती ५०.५७ टक्के राहिली. राज्यातलं वाढतं कुपोषण, महिलांवरील अत्याचार, पिकांना योग्य भाव नाही, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, ग्रामीण भागातलं वाढतं भारनियमन/ अपरात्री कृषी वीजपुरवठा, ढासळती कायदा सुव्यवस्था, वाढती व्यसनाधीनता, कापूस उत्पादक प्रदेशास लाभदायक असलेलं मात्र राजकीय वादात सापडलेलं वस्त्रोद्योग धोरण, विदर्भाचा वाढता अनुशेष, वाढती बेरोजगारी या आणि अन्य प्रश्नांची मोठी मालिकाच सभागृहाच्या दारात वाट बघत होती.

अधिवेशनासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ९५ कोटींच्या खर्चाचा आराखडा तयार केला होता. सन २०१९ मध्ये नागपूरला झालेल्या अधिवेशनासाठी ६५ कोटी खर्च झाला होता. त्यामध्ये ३० कोटींचा अतिरिक्त खर्च पकडून २०२२ च्या अधिवेशनासाठी खर्चाचा आराखडा तयार केला होता. प्रत्यक्षात हा खर्च १०० कोटींच्या घरात गेला असण्याची शक्यता आहे. सन

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।  
या मज सोडवा लवकरी ॥१॥  
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।  
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पालिकेच्या कॅग चौकशीसाठी धावाधाव!

## राज्य सरकारने महाधिवक्त्यांचा अभिप्राय मागवला

**। मुंबई। महाईन्यूज ।**

मुंबई महापालिकेच्या सुमारे १२ हजार कोटी रुपयांच्या विविध ७६ कामांमध्ये झालेल्या कथित गैरव्यवहाराची चौकशी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांमार्फत (कॅग) करण्याचा आदेश राज्य सरकारने दिला असला तरी साथरोग नियंत्रण कायद्यान्वये करोना नियंत्रणासाठी झालेल्या खर्चाची चौकशी करण्यास प्रशासनाने तीव्र आक्षेप घेतला आहे. त्यामुळे राज्य सरकारने आता महाधिवक्त्यांचे मत मागविणार आहे.राज्यात सत्तांतर झाल्यानंतर मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर कुरघोडी करताना, पालिकेत २८ नोव्हेंबर २०१९ ते २८ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत विविध १० विभागांमध्ये करण्यात आलेल्या १२ हजार २३ कोटी ८८ लाख रुपये खर्चाच्या कामांची 'कॅग'मार्फत चौकशी करण्याचा निर्णय शिंदे- फडणवीस सरकारने घेतला होता. त्यानुसार पालिकेने प्रामुख्याने करोनाकाळात विविध बाबींवर खर्च केलेले ३५३८ कोटी ७३ लाख, करोनाकाळात तीन रुग्णालयांसाठी केलेली ९०४ कोटी ८४ लाख रुपयांची खरेदी, बांधकाम व्यावसायिक अजमेरा यांच्या भूखंडाची ३३९ कोटी १४ लाख रुपयांना केलेली खरेदी, चार पुलांच्या बांधकामावर झालेला १४९६ कोटींचा खर्च, शहरातील ५६ रस्त्यांच्या दुरुस्तीवर झालेला २२८६ कोटी २४ लाखांचा खर्च, सहा सांडपाणी प्रकल्पांवर झालेला १०८४ कोटी ६१ लाखांचा खर्च, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांवरील १०२० कोटी ४८ लाखांचा खर्च, माहिती आणि तंत्रज्ञान विभागातील १५६ कोटी ४१ लाखांचा खर्च, तीन मलनि:सारण प्रक्रिया केंद्रांसाठी ११८७ कोटी ३६ लाखांचा खर्च यांसह पाच हजार खाटांचे रुग्णालय आणि त्याला पूरक गोष्टींसाठी मोकळया जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया आदींचे विशेष लेखापरीक्षण सध्या 'कॅग' करीत आहे.



गेला महिनाभर 'कॅग'चे अधिकारी महालिकेतील या प्रकरणांच्या मुळाशी जाण्याचा आणि त्यात कोणी-कोणी हात धुवून घेतले याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही चौकशी आता पूर्ण होत आली असून विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात चौकशी अहवाल मांडून ठाकरे गटाची कोंडी करण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

**चौकशी कशाची?**

पालिकेने करोनाकाळात लाइफलाइन हॉस्पिटल मॅनेजमेंट सव्हिसेसला पाच करोना केंद्रांसाठी १०० कोटी रुपयांचे कंत्राट दिले होते. या कंपनीशी २६ जून २०२० रोजी करार करण्यात आला, तेव्हा या कंपनीची कुठेही नोंदणी नव्हती.

पालिकेने रेमडीसीवीर १५६८ रुपये प्रति कुपी या दराने ७ एप्रिल २०२० मध्ये दोन लाख कुपीची आर्डर देण्यात आली. मात्र हाफकीन आणि मीरा भाईंदर महानगरपालिकेने तेच रेमडीसिवीर ६६८ रुपये दराने खरेदी केले. त्यामुळे यात मोठा गैरव्यवहार झाल्याचा सरकारला संशय आहे.

जून-जुलै, २०२१ मध्ये पालिकेने विविध रुग्णालयांमध्ये प्राणवायूनिर्मिती संयंत्रे खरेदी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार १६ जून २०२१ रोजी 'हायवे कन्स्ट्रक्शन' कंपनीला कंत्राट देण्यात आले. मात्र ही कंपनी काळ्या यादीतील असल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे याही कंत्राटात मोठा गैरव्यवहार झाल्याचा सरकारला संशय आहे.

### पालिकेचा नकार का?

**» करोनाकाळात राज्यात सन १८९७चा साथरोग अधिनियम लागू करण्यात आला होता. त्यामुळे करोना नियंत्रणासाठी विविध उपाययोजना करताना साथरोग कायद्यांतर्गत झालेल्या खर्चाची चौकशी केली जाऊ शकत नाही, अशी भूमिका घेत मुंबई महापालिका प्रशासनाने खर्चाचा तसेच खरेदीचा तपशील देण्यास 'कॅग'ला नकार दिला आहे.**

### विधि विभागाची भूमिका..

**» तपशील देण्यास पालिका प्रशासनाने नकार दिल्यानंतर 'कॅग'ने ही बाब राज्य सरकारच्या निदर्शनास आणली. सरकारने याबाबत विधि आणि न्याय विभागाचे मत मागविले. त्यावर, साथरोग नियंत्रणावरील खर्चाचे लेखापरीक्षण करता येईल, मात्र त्यावर पुढे काही कार्यवाही करता येणार नाही, असा अभिप्राय विधि विभागाने दिला.**

# दी बर्निंग कंटेनर...



सातारा : मुंबई-बंगळुरू महामार्गावर रविवारी एका चालत्या कंटेनरला दुपारच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कुठलीही जिवीतहानी झाली नसली तरी वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मुंबई, पुण्याहून कोल्हापूरच्या दिशेने जाणारी वाहने खंबाटकी खाटामध्ये विरुद्ध लेनमधून सोडण्यात आली. परिणामी काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पुणे, मुंबईहून सातारा, कोल्हापूरला जाणार्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. (छायाचित्र : निलेश दुटाळ)

# पोलीस भरतीमधील उमेदवार डोपिंगच्या विळख्यात?



**। अलिबाग । महाईन्यूज ।**

रायगड पोलीस दलात भरतीसाठी आलेले उमेदवार डोपिंगच्या विळख्यात अडकले असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. दोन उमेदवार आणि एका प्रशिक्षकाकडे उत्तेजक द्रव्य असलेल्या वायल्स , इंजेक्शन्स आणि सुया तसेच कॅप्सुल्स सापडल्या आहेत.पोलीस दलात भरतीसाठी आलेल्या उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्य असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी अलिबाग जवळील वरसोली येथील उमेदवार रहात असलेल्या कॉटेज वर धाड टाकली. तेंव्हा त्यांच्याकडे २ इंजेक्शन्स , तीन औषधांची कुप्या, ४४ सुया, काही गोळ्या, कॅप्सुल आढळल्या. पोलिसांनी हे सर्व साहित्य जप्त केले आहे. औषधांच्या बॉटल्स वरील लेबल काढून टाकण्यात आले आहे.

ही औषधे घेतल्यास मैदानी चाचणीत फायदा होतो अशी कबुली या उमेदवारांनी दिली आहे. दोन पैकी एका उमेदवाराची काल मैदानी चाचणी झाली आहे. तिघांपैकी दोघे पुण्याचे तर एकजण नगर जिल्ह्यातील आहे. तिघांच्याही रक्ताचे नमुने आणि जप्त केलेली औषधे तपासणीसाठी पाठविण्यात आली आहेत. तूर्तास तिघांनाही सोडून देण्यात आले आहे. तपासणी अहवाल आल्यानंतर निष्कर्ष पाहून पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

उमेदवारांनी शासनाने प्रतिबंधित केलेले कोणतीही वस्तू, पदार्थ किंवा उत्तेजक द्रव्य सेवन करून भरती प्रक्रियेस सामोरे जाऊ नये.

# धुक्यामुळे चीनमधील 17 जणांचा मृत्यू!

## » चीनमध्ये अनेक गाड्या एकमेकांवर आदळल्या, 22 जण जखमी



।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

चीनमध्ये धुक्यामुळे समोरील काही न दिसल्याने अनेक गाड्या एकमेकांवर आदळल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला असून २२ जण जखमी झाले आहेत. ही घटना दक्षिणी चीनमध्ये रविवारी सकाळी घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, चीनमध्ये नववर्षाचा उत्सव सुरु असून, लोक सुट्टी काढून बाहेर फिरायला जात आहेत. अशातच धुक्यांमुळे या नागरिकांच्या आनंदावर विरजण पडले आहे. पर्यटकांची वाहने एकमेकांवर आदळली. अपघात ग्रस्त वाहनांची संख्या मोजली जात आहे. अजून प्रचंड धुके असल्याने समोरील काही दिसत नाही. जेवढे जखमी सापडत आहेत तेवढ्यांना रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले जात आहे. स्थानिक वाहतूक व्यवस्थापन ब्रिगेडने दिलेल्या माहितीनुसार जिआंगशी प्रांतातील नानचांग शहराच्या बाहेरील भागात हा अपघात झाला.

सुट्टीच्या काळात ड्रायव्हर आणि प्रवाशांची संख्या वाढते. चंद्र वर्ष हे चीनमधील कुटुंबे ही एकत्र येऊन साजरे करतात. यामुळे लाखो प्रवासी त्यांच्या गावी परततात. कोविड-19 चे बहुतेक निर्बंध हटवल्यामुळे या वर्षी 22 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या आठवडाभराच्या सणासुदीच्या हंगामात मोठ्या संख्येने लोक प्रवास करतील अशी अपेक्षा आहे. त्यातच चीनचा बहुतांश भाग कोरोनाग्रस्त आहे.

कोविड-19 चे निर्बंध हटवण्यात आले असताना नवीन वर्षाच्या निमित्ताने लोक घराबाहेर पडत आहेत. नवीन वर्षाचा उत्सव पुढील एक आठवडा सुरू राहणार असून 22 जानेवारीपासून सुरू होईल. दरम्यान, अनेकदा असे अपघात ड्रायव्हरच्या थकव्यामुळे आणि खराब देखभाल केलेल्या वाहनांमुळे किंवा ओव्हरलोड वाहनांमुळे होतात. परंतु कठोर नियमांमुळे अलिकडच्या वर्षांत त्यांच्या घटना कमी झाल्या आहेत.

याआधी, डिसेंबरमध्ये चीनमधील झेंगझोऊ येथेही अशी मोठी दुर्घटना घडली होती. त्यावेळी एका पुलावर सुमारे 200 वाहने एकमेकांवर आदळली होती. या अपघातात एकाचा मृत्यू झाला होता. तो अपघातही दाट धुक्यामुळे झाला होता.

### कठोर नियमांमुळे घटना कमी झाल्या

» कोविड-19 चे निर्बंध हटवण्यात आले असताना नवीन वर्षाच्या निमित्ताने लोक घराबाहेर पडत आहेत. नवीन वर्षाचा उत्सव पुढील एक आठवडा सुरू राहणार असून 22 जानेवारीपासून सुरू होईल. दरम्यान, अनेकदा असे अपघात ड्रायव्हरच्या थकव्यामुळे आणि खराब देखभाल केलेल्या वाहनांमुळे किंवा ओव्हरलोड वाहनांमुळे होतात. परंतु कठोर नियमांमुळे अलिकडच्या वर्षांत त्यांच्या घटना कमी झाल्या आहेत.

# कोविडबाबत चीनची अरेरावी सुरूच; करोना धोरणावर टीका

## » एक हजाराहून अधिक सोशल मीडिया खात्यांवर कारवाई

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या काही काळात भारतासह जगभरात करोना विषाणूचा संसर्ग आटोक्यात आला आहे. मात्र, चीनमध्ये अद्याप करोना विषाणूचं थैमान सुरू आहे. येथे दररोज हजारो करोनाबाधित रुग्ण आढळत आहेत. देशात करोना रुग्णांची संख्या वाढत असताना चीनमधील नागरिकांमध्ये सरकार आणि करोना धोरण राबवणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात असंतोष निर्माण होत आहे. अनेकजण सोशल मीडियाच्या माध्यमातून चिनी सरकारच्या करोना धोरणावर टीका करत आहेत.

याच पार्श्वभूमीवर चीनने सरकारच्या कोविड धोरणावर टीका करणाऱ्या एक हजाराहून अधिक सोशल मीडिया खात्यांवर कारवाई केली असून संबंधित खाती निलंबित अथवा बंद केली आहेत. यातील बऱ्याच खात्यांना लाखो फोलोअर्स आहेत. चीनमधील सोशल मीडिया प्लॅटफॉर्म WEIBO ने आपल्या निवेदनात म्हटलं की, चीनमधील कोविड तज्ज्ञांवर वैयक्तिक टीका करणारे अकाऊंट्स निलंबित किंवा बंद केले आहेत. पण नेमक्या कोणत्या पोस्टमुळे ही कारवाई करण्यात आली, याबाबत WEIBO कोणताही खुलासा केला नाही.

चीन सरकारने डिसेंबरमध्ये 'शून्य-कोविड धोरण' रद्द केले. हे कठोर धोरण रद्द करताचा करोना संक्रमण आणि मृतांची झपाट्याने वाढली. यानंतर अनेकांनी सोशल मीडियावर सरकारच्या कोविड धोरणाविरोधात आवाज उठवला. कोविड नियमांच्या कठोर अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

काही नेटकऱ्यांनी कोविड तज्ज्ञांवरही निशाणा साधला. जे तज्ज्ञ काही आठवड्यांपूर्वी सरकारच्या कठोर करोना निर्बंधांचे समर्थन करत होते. तेच तज्ज्ञ आता अचानक सरकारच्य 'झिरो कोविड धोरण' रद्द करण्याच्या निर्णयाचा बचाव करत आहेत, असा दावा नेटकऱ्यांकडून केला जात आहे. यामुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म WEIBO ने एक हजार १२० सोशल मीडिया खात्यांवर तात्पुरती किंवा कायमची बंदी घातली आहे.



### टीका करणारे अकाऊंट्स निलंबित

»सरकारच्या कोविड धोरणावर टीका करणाऱ्या एक हजाराहून अधिक सोशल मीडिया खात्यांवर कारवाई केली असून संबंधित खाती निलंबित अथवा बंद केली आहेत. यातील बऱ्याच खात्यांना लाखो फोलोअर्स आहेत. चीनमधील सोशल मीडिया प्लॅटफॉर्म WEIBO ने आपल्या निवेदनात म्हटलं की, चीनमधील कोविड तज्ज्ञांवर वैयक्तिक टीका करणारे अकाऊंट्स निलंबित किंवा बंद केले आहेत.

# सेंट्रल सेनेगलमध्ये दोन बसचा भीषण अपघात

## सुमारे 40 जणांचा मृत्यू, 78 जखमी

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



सेंट्रल सेनेगलमध्ये दोन बसच्या भीषण अपघातात 40 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. काफरिन भागातील गनीबी गावात रविवारी पहाटे 3:30 वाजताच्या सुमारास हा अपघात झाला असून, या अपघातात तब्बल 78 जण जखमी झाले आहेत.

या अपघाताबाबत राष्ट्रपती मॅकी सॉल यांनी माहिती दिली. तसेच, "आज गनीबी येथे झालेल्या भीषण रस्ता अपघातामुळे मला खूप दु:ख झाले आहे, ज्यात 40 लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. मी पीडितांच्या कुटुंबियांप्रती शोक व्यक्त करतो आणि जखमींना लवकरात लवकर बरे व्हावे अशी मी प्रार्थना करतो", असेही त्यांनी सांगितले.

### तीन दिवसांचा दुखवटा जाहीर

» या अपघाताच्या पार्श्वभूमीवर तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केल्याचे राष्ट्रपती मॅकी सॉल यांनी सांगितले. रस्ता सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. हा अपघात राष्ट्रीय मार्ग क्रमांक-1 वर झाला. दरम्यान, टायर पंक्चर झाल्यामुळे सार्वजनिक बस दुसऱ्या बसला धडकली. त्यामुळे बस उलटली. या अपघातात 78 जण जखमी झाले असून त्यापैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

# आलिशान गाड्या सोडून ट्विंकलने केला रिक्षातून प्रवास



बॉलिवूड स्टार्स नेहमीच त्यांच्या आलिशान वाहनातून प्रवास करतात. पण असे अनेक कलाकार आहेत जे आपली महागडी वाहने सोडून मुंबईच्या रस्त्यावर ऑटोरिक्षाचा आनंद लुटताना दिसतात. अक्षय कुमारची पत्नी ट्विंकल खन्नाही तिच्या मुलीसोबत ऑटो रिक्षामध्ये फिरताना दिसली आहे.

ट्विंकल खन्नाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, ट्विंकल तिची छोटी राजकुमारी नितारासोबत ऑटो रिक्षामध्ये प्रवास करत आहे. तिच्या मुलीच्याही हातात काही शॉपिंग बॅग आहेत.

ट्विंकल खन्ना आणि तिची लाडकी मुलगी ऑटोरिक्षात बसताना पाहून पापाराझींनी त्यांना आपल्या कॅमेऱ्यात कैद केले आहे. शेवटी, हा क्षण सर्वांसाठी खास होता, कारण बॉलिवूडचा ॲक्शन किंग अक्षय कुमारची पत्नी आणि मुलगी त्यांच्या महागड्या आलिशान गाड्या सोडून सार्वजनिक वाहतुकीचा आनंद लुटताना याआधी क्वचितच पाहिलं असेल.

# विशाखा सुभेदार साकारणार रागिणी आत्या.. 'या' मालिकेत होणार दमदार एंट्री..



या कार्यक्रमाला रामराम केल्यानंतर विनोदाची राणी अभिनेत्री विशाखा सुभेदार जवळपास वर्षभराने पुन्हा एकदा मालिका विश्वात पदार्पण करत आहे. 'स्टार प्रवाह' वरील 'शुभविवाह' या मालिकेतील ती आत्याबाईच्या भूमिकेत दिसणार आहे. सध्या या मालिकेचा प्रोमो चांगलाच व्हायरल होत आहे.

स्टार प्रवाहवर १६ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या 'शुभविवाह' मालिकेची प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता आहे. मालिकेच्या प्रोमोना भरभरुन प्रतिसाद मिळत असून या नव्या कुटुंबाला भेटण्यासाठी प्रेक्षक आतूर आहेत. या मालिकेत विशाखा सुभेदर रागिणी आत्या हे पात्र साकारणार आहेत. स्टार प्रवाहच्या आंबटगोड मालिकेत त्यांनी साकारलेली भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात आहे. त्यानंतर जवळपास १२ वर्षांनंतर त्या पुन्हा एकदा स्टार प्रवाहच्या शुभविवाह मालिकेत दिसणार आहेत. शुभविवाह मालिकेतील रागिणी आत्या या पात्राविषयी सांगताना विशाखा सुभेदार म्हणाल्या, 'रागिणी प्रचंड महत्वाकांक्षी आहे. अनेक घटनांसाठी ती जबाबदार आहे याची तिला जाणीव आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्ट

# 'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वाचा विजेता कोण?

'बिग बॉस' मराठीच्या चौथ्या पर्वाचा रंजक प्रवास आता लवकरच संपणार आहे. 'बिग बॉस' मराठीच्या महाअंतिम सोहळ्याला सुरवात झाली आहे. यंदा 'बिग बॉस' मराठीचा विजेता कोण ठरणार? याकडे अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे. या सोहळ्यात पर्वातून बाहेर पडलेले स्पर्धकदेखील सहभागी झाले आहेत. यातीलच एका स्पर्धक मेघा घाडगेने कोण विजेता होणार यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.

ठसकेबाज लावणी व अदांनी चाहत्यांचं लक्ष वेधून घेणारी मेघा 'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वात सहभागी झाली होती. मेघाने तिचा लावणीतील ठसकेबाजपणा 'बिग बॉस'च्या घरातही दाखवला होता. या सोहळ्यात महेश मांजरेकरांनी तिला प्रश्न विचारला "तुझ्यामते कोण विजेता होईल?" त्यावर तिने उत्तर दिले की "कोणाला अपेक्षा नसेल पण मी किरण मानेच नाव घेते, तो होऊ शकतो विजेता." अशी प्रतिक्रिया तिने दिली आहे.दरम्यान 'बिग बॉस खबरी' या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन बिग बॉस मराठीच्या चौथ्या पर्वातील टॉप ५ स्पर्धकांचा व्होटिंग ट्रेंड शेअर करण्यात आला आहे. या ट्रेंडनुसार अभिनेता किरण माने पहिल्या क्रमांकावर आहेत. त्यापाठोपाठ राखी सावंत दुसऱ्या स्थानावर, अपूर्व नेमळेकर तिसऱ्या, अमृता धोंगडे चौथ्या आणि अक्षय केळकर पाचव्या स्थानावर आहे.





# रॉकी भाई पुन्हा एकदा करणार 'सलाम'!



'पुष्पा', 'कांतारा', 'केजीएफ' या चित्रपटांनी मागच्यावर्षी बॉक्स ऑफिसवर कमाई केली होती. 'केजीएफ' फेम अभिनेता यश याला या चित्रपटामुळे एक वेगळी ओळख मिळाली आहे. या चित्रपटातील 'रॉकी भाई' या त्याच्या पात्राला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं आहे. त्याचे जगभरात करोडो चाहते आहेत. आज यशचा वाढदिवस आहे. त्याच्या वाढदिवसानिमित्त केजीएफच्या निर्मात्यांनी एक मोठी घोषणा केली आहे.

'केजीएफ' चित्रपटाचा पहिला भाग २०१८ साली प्रदर्शित झाला होता तर दुसरा भाग मागच्या वर्षी प्रदर्शित झाला. निर्मात्यांनी तिसऱ्या भागाची हिंट दिली आहे. मात्र चाहत्यांना हा या चित्रपटाची पाहावी लागणार आहे. कारण या चित्रपटाचे चित्रीकरण २०२५ साली सुरु करण्यात येणार आहे. सध्या या चित्रपटाच्या कथेवर काम सुरु आहे. चित्रपटाची निर्मिती करणाऱ्या होम्बाळे प्रॉडक्शनने ट्वीट करत माहिती दिली.'केजीएफ' हा मूळ कन्नड चित्रपट असून तो कोळसा माफियांवर आधारित चित्रपट होता. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रशांत निल यांनी केले असून चित्रपटाची निर्मिती होम्बाळे प्रॉडक्शनने केली होती. या चित्रपटामुळे अभिनेता यश प्रसिद्धीच्या झोतात आला, विशेष म्हणजे या चित्रपटाच्या दुसऱ्या भागात रविना टंडन, संजय दत्तसारखे बॉलिवूड कलाकार होते. प्रेक्षकांना आता तिसऱ्या भागाची उत्सुकता लागली आहे.

# "...तर अशोक सराफ मुख्यमंत्री असते," राज ठाकरेंचे विधान!

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे निमित्त साधून पुण्यात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हेदेखील उपस्थित होते. यावेळी आपल्या भाषणादरम्यान राज ठाकरे यांनी अशोक सराफ यांचे तोंडभरून कौतूक केले. अशोक सराफ दक्षिण भारतात असते, तर आज ते मुख्यमंत्री असते, असे राज ठाकरे म्हणाले."अशोक सराफ यांनी नाटक, चित्रपट, टीव्ही मालिका अशा वेगवेगळ्या क्षेत्रात काम केले. अशोक सराफ हे दक्षिणेत असते तर मुख्यमंत्री असते. ४०-४० फूट उंचीचे त्यांचे कटआऊट लावले असते. आपल्याकडे महाराष्ट्रात तसे काहीही नाही. कलावंत आहे का. मग ठीक आहे, एवढे बोलून आपल्याकडे विषय संपवला जातो. कलावंतांचं महत्त्व परदेशी गेल्यावर समजत नाही," असे राज ठाकरे म्हणाले.

"परदेशात कलावंतांच्या नावाने विमानतळं असतात.



आपल्याकडे कलावंतांच्या नावाने चौक असतात. आपल्याकडे प्रतिमा जेवढी जपली जाते तेवढी प्रतिभा जपली जात नाही. मी अशोक सराफ यांचा कलावंत म्हणून नेहमीच आदर करत आलो. इतकी वर्ष लोकांना भूरळ घालणं तसेच सतत वेगवेगळे प्रयोग करत राहणं सोपी आणि साधी गोष्ट नाही. अशोक सराफ युरोपात असते तर त्यांच्या स्वागतासाठी आज मंचावर पंतप्रधान असते," असे गौरवोद्गार राज ठाकरे यांनी काढले.

## मंगळवारपासून भरणार राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचा आखाडा; पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

# 'महाराष्ट्र केसरी'ला महिंद्रा थार जीपचे बक्षीस!

### 18 विविध वजनी गटात राज्यभरातील 45 संघांचे 900 पैलवान भिडणार

।पुणे । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

प्रतिष्ठित 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेचा थरार मंगळवारपासून अनुभवता येणार आहे. १० ते १४ जानेवारी या कालावधीत या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचा आखाडा भरणार असून, 'महाराष्ट्र केसरी'च्या विजेत्याला महिंद्रा थार जीप व रोख पाच लाखांचे बक्षीस, तर उपविजेत्याला ट्रॅक्टर व रोख अडीच लाखांचे बक्षीस मिळणार आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीगीर योगेश्वर दत्त यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १०) सायंकाळी ६ वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती 'महाराष्ट्र केसरी'चे प्रमुख संयोजक माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली.



६५ व्या 'महाराष्ट्र केसरी'च्या तयारीचा आढावा व भव्य मैदानाची पाहणी केल्यानंतर मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकारांशी संवाद साधला. प्रसंगी पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. संदीप भोंडवे, पुणे राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष पै. योगेश दोडके, चिंचवड कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. हनुमंत गावडे, पुणे शहर राष्ट्रीय तालीम संघाचे विश्वस्त पै. तात्यासाहेब भिंताडे, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष विलास कथुरे यांच्यासह संयोजन समितीचे व विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, "कोथरूड येथील कुस्तीमहर्षी स्वर्गीय मामासाहेब मोहोळ क्रीडानगरी पैलवान, कुस्तीप्रेमींच्या मेळ्यासाठी सज्ज झाली आहे. भव्य ३२ एकर जागेत ही क्रीडानगरी साकारली असून, त्यात १२ एकरमध्ये ८० हजार आसनक्षमतेचे मैदान, दोन माती व तीन गादीचे आखाडे आहेत. अतिमहत्वाच्या व्यक्ती, पैलवान, महिला, पत्रकार यांच्यासाठी स्वतंत्र प्रेक्षागॅलरी उभारण्यात आल्या आहेत. २० एकर जागेत पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. यासह आरोग्य, अग्निशमन, सुरक्षा व्यवस्थेचे चोख नियोजन केले आहे. एका कार्डियाक ॲम्ब्युलन्ससह चार ॲम्ब्युलन्स, डॉक्टरांची टीम, १००० पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. सह्याद्री व जहांगीर हॉस्पिटल आणि क्रस्ना डायग्नोस्टिक आरोग्य व्यवस्था पाहणार आहे."

"राज्यातील ४५ तालीम संघातील विविध १८ वजनी गटात सुमारे ९०० पेक्षा अधिक पैलवान स्पर्धेत सहभागी होणार आहेत. प्रत्येक वजनी गटातील विजेत्यांना 'येजडी जावा' ही मोटारसायकल व रोख बक्षीस दिले जाणार आहे. उपविजेत्यानाही बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी उपांत्य व अंतिम लढतीची चुरस पाहायला मिळणार आहे. समारोपाच्या दिवशी शनिवारी (दि. १४) सायंकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष खासदार ब्रिजभूषण सिंग, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष खासदार रामदास तडस यांच्या हस्ते 'महाराष्ट्र केसरी'च्या विजेत्याला गौरवण्यात येणार आहे. त्याचबरोबर यापूर्वीचे महाराष्ट्र केसरी, विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे," असे मुरलीधर मोहोळ यांनी नमूद केले.

#### पैलवानांच्या स्वागताला आखाडा सज्ज

»"मातीचा आखाडा ही महाराष्ट्राच्या कुस्तीची ओळख आहे. दोन आखाड्यांत माती विभागातील कुस्ती होणार असून, पैलवानांच्या स्वागतासाठी आखाडा सज्ज आहे. पैलवानांना कुस्ती करताना अडचण होऊ नये, यासाठी त्यात हळद, मीठ, काव, लिंबू, तेल मिसळून खास आखाडा तयार केला जात आहे, असे विलास कथुरे यांनी सांगितले.

#### मामासाहेबांना अभिवादन

»"स्वर्गीय मामासाहेब मोहोळ यांच्या संकल्पनेतून आणि दूरदर्शी विचारातून 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धा सुरु झाली. यंदाच्या ६५ व्या 'महाराष्ट्र केसरी'चे संयोजन करण्याची जबाबदारी आम्हा मोहोळ कुटुंबियांकडे आली, ही आनंदाची व गौरवाची बाब आहे. 'महाराष्ट्र केसरी'ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या मामासाहेब मोहोळ यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. त्यांच्या कर्तृत्वाला शोभेल अशा स्वरूपाची ही स्पर्धा होणार आहे, असेही

#### 'ते' पत्रक दिशाभूल करणारे

भारतीय कुस्ती संघाने महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अस्थायी समितीमार्फत ही स्पर्धा अधिकृतपणे घेण्याची जबाबदारी संस्कृती प्रतिष्ठानवर सोपवली आहे. राज्यातील ४५ तालीम संघांचे कुस्तीगीर, पदाधिकारी आमच्यासोबत आहेत. असे असतानाही खोडसाळपणे पत्रक काढून विरोधकांकडून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यंदाची 'महाराष्ट्र केसरी' यशस्वी करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करत असून, अशा खोडसाळ गोष्टींवर लक्ष देण्याची गरज नाही, असे मुरलीधर मोहोळ यांनी नमूद केले.

---

# महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी आमदार रोहित पवार

### क्रिकेट क्षेत्रातील संघटनात्मक संस्थांवर 'बॅटिंग' करण्यासाठी सज्ज

।मुंबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे नातू आमदार रोहित पवार यांची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यामुळे पवारांनंतर त्यांच्या पावलावर पाउल टाकत रोहीत पवार क्रिकेट क्षेत्रातील संघटनात्मक संस्थांवर 'बॅटिंग' करण्यासाठी सज्ज झाले आहेत.



पुण्यामध्ये गहुंजे स्टेडियमवर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या झालेल्या बैठकीत आज रोहित पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे देशाच्या आणि राज्याच्या राजकीय वर्तुळात नेहमीच केंद्रस्थानी राहिले आहेत. राजकारणासोबतच देश आणि राज्य पातळीच्या क्रिकेट बोर्डाच्या निवडणुकीत शरद पवार यांनी अनेकांना चितपट केल्याचा इतिहास आहे. यावेळीही महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी नेमकं कोण बसणार? याबाबत क्रिकेट पासून महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चा सुरू होत्या. मात्र आता त्या चर्चेला पूर्णविराम मिळाला असून, रोहित पवार हे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत.

#### शरद पवार यांच्या गटाकडून एन्ट्री

» शरद पवार यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीसाठी गेले काही महिने जबरदस्त तयारी केली होती. या निवडणुकीत विजयी होण्यासाठी भाजप कडून देखील तेवढीच तयारी झालेली पाहायला मिळाली. भाजपचे आमदार आणि नेते आशिष शेलार यांनीही मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या पदावर आपल्या गटाकडून अध्यक्ष निवडून यावा यासाठी काही महिन्या आधीपासूनच मोर्चे बांधणी सुरू केली होती. मात्र नंतर पवार आणि भाजप एकत्र आल्याने सर्वच राजकीय नेत्यांना आणि खेळाडूंना धक्का बसला होता. याच वेळी रोहित पवार यांची शरद पवार यांच्या गटाकडून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत एन्ट्री झाली होती. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर रोहित पवार यांनी सर्वांचे धन्यवाद मानले. क्रिकेटपटूंसाठी काम करण्याची संधी मिळाली, हे माझं भाग्य आहे. आपल्या सर्वांच्या शुभेच्छा सोबत आहेतच. सर्वांना सोबत घेऊन खेळाडूंना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न राहील, असे ते म्हणाले. तसेच उपाध्यक्षपदी निवड झालेले सहकारी किरण सामंत, सचिव शुभेंद्र भांडारकर, खजिनदार संजय बजाज व सह सचिव संतोष बोबडे यांचेही त्यांनी अभिनंदन केले आहे.